# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १७ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- वक्फ कायद्यासंदर्भात पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड किंवा वक्फ परिषदेवर कोणतीही नियुक्ती करणार नाही–केंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयासमोर ग्वाही
- सत्ताधारी व्यक्तीने संवेदनशील असण्याची गरज उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याकडून व्यक्त
- स्पर्धापरीक्षांच्या उमेदवारांची दिशाभूल केल्याप्रकरणी काही कोचिंग क्लासेसना नोटीस
- राज्यशासनाचे चित्रपट पुरस्कार जाहीर–येत्या २५ तारखेला समारंभपूर्वक वितरण

आणि

- नांदेड जिल्ह्यात ३१ तर धाराशिव जिल्ह्यात ७९ जणांना अन्नातून विषबाधा–सर्वांची प्रकृती स्थिर

****

वक्फ कायद्यासंदर्भात पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड किंवा वक्फ परिषदेवर कोणतीही नियुक्ती करणार नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिली आहे. वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या सुनावणीचा सारांश न्यायालयाने आज सादर केला. या सुनावणी दरम्यान न्यायालयाने काही प्रश्न विचारले असून, केंद्र सरकारने याबाबत आपलं उत्तर सादर करण्यास, सात दिवसांची मुदत मागितली आहे. शिवाय, पुढील सुनावणीपर्यंत, कोणत्याही वक्फ मालमत्तेची अधिसूचना रद्द केली जाणार नाही तसंच नियुक्त जिल्हाधिकारी

कार्यालयात कोणताही बदल केला जाणार नाही, असंही महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितलं.

****

सत्ताधारी व्यक्तीने संवेदनशील असण्याची गरज उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केली आहे. ते आज नवी दिल्लीत एका कार्यक्रमात संबोधित करत होते. संसदेनं मंजूर केलेल्या विधेयकांवर राष्ट्रपतींना निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निर्धारित करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर धनखड यांनी चिंता व्यक्त केली. जिथे न्यायाधीशचं कायदे तयार करतील, कार्यपालिकेचं काम करतील, आणि सुपर संसद म्हणून कार्यरत असतील, अशा लोकशाहीची आपल्या देशाने कल्पनाही केली नव्हती, असं उपराष्ट्रपतींनी नमूद केलं.

****

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने आय आय टी – जे ई ई, नीट आणि इतर स्पर्धापरीक्षांचं प्रशिक्षण देणाऱ्या काही कोचिंग क्लासेसना विद्यार्थ्यांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती केल्याबद्दल नोटीस बजावली आहे. कोचिंग क्लासेसनी आपल्या जाहिरातींमध्ये परीक्षेत यशाची खात्री देणारी किंवा नोकरी मिळवून देण्याची आश्वासने देऊ नयेत, सर्व अटी आणि शर्ती ठळकपणे छापाव्यात आणि जाहिरातीत छापल्याप्रमाणे सर्व आश्वासनं पाळावीत अशा सूचना प्राधिकरणाने दिल्या आहेत.

****

केंद्र सरकारने संरक्षण खर्चाच्या ७५ टक्के रक्कम देशांतर्गत कंपन्यांकडून खरेदीसाठी राखीव ठेवली आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं आहे. आज नवी दिल्ली इथं झालेल्या संरक्षण परिषदेत ते बोलत होते. सरकारने २०२९ पर्यंत ३ लाख कोटी रुपयांच्या संरक्षण उपकरणांच्या निर्मितीचं उद्दीष्ट ठेवलं असल्याचं सिंह यांनी सांगितलं.

****

दरम्यान, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे उद्या शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. दुपारी साडेचार वाजता विशेष विमानाने ते शहरात पोहोचतील, सिडको परिसरातल्या कॅनॉट इथल्या उद्यानात उभारण्यात आलेल्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याचं अनावरण सिंह यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमानंतर ते उद्योजकांशी संवाद साधतील. त्यानंतर ते विशेष विमानाने लखनऊ कडे रवाना होणार आहेत.

****

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे चित्रपट पुरस्कार आज जाहीर झाले. चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार प्रसिद्ध अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना, स्वर्गीय राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना तर गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना जाहीर झाला आहे. दहा लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असं या सर्व पुरस्कारांचं स्वरूप आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री विधीज्ञ आशिष शेलार यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना तर स्वर्गीय राज कपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल यांना जाहीर झाला आहे. सहा लाख रुपये, स्मृतीचिन्ह, मानपत्र असं या दोन्ही पुरस्कारांचं स्वरूप आहे. येत्या २५ एप्रिलला मुंबईत हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केले जाणार आहेत.

****

नांदेड जिल्ह्यात विष्णुपुरी इथं पाणीपुरी खाल्याने ३१ महाविद्यालय विद्यार्थ्यांना विषबाधा झाली. श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील हे विद्यार्थी आहेत. काल रात्री पाणीपुरी खाल्ल्यानंतर आज या विद्यार्थ्यांना उलटी, मळमळ, पोटदुखीचा त्रास झाला. त्यांना तातडीने डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या सर्वांवर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं.

****

धाराशिव जिल्ह्यातही जेवणातून ७९ जणांला विषबाधा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. उमरगा तालुक्यातील कराळी इथं जागरण गोंधळ कार्यक्रमाच्या जेवणातून ही विषबाधा झाली. विषबाधा झालेल्यांपैकी २४ रुग्ण उमरगा उपजिल्हा रुग्णालयात, ४५ जणांवर खासगी रुग्णालयात तर मूळ प्राथमिक आरोग्य केंद्रात दहा जणांवर उपचार सुरू असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थांना ग्रेटर बॉम्बे विज्ञान शिक्षक संघटनेच्या वतीने डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक पुरस्कार दिला जातो. शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये इयत्ता सहावी आणि नववी वर्गासाठी देशभरातील आठ केंद्रावर घेण्यात आलेल्या डॉ.

होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत नागपूरच्या स्पृहा शिनखेडे हीने सुवर्णपदक पटकावलं आहे. ती सहावी वर्गात शिकते आहे. गेल्या १२ एप्रिल रोजी मुंबईत पार पडलेल्या या स्पर्धेत तीने सहभाग घेतला होता.

****

बीड जिल्ह्यातले भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते बाबासाहेब आगे यांच्या निर्घृण हत्येनंतर पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली आहे. लोकसभा निवडणुकीत बुथ विस्तारक म्हणून आगे यांनी मोठी मेहनत घेतली होती, अशा मनमिळावू कार्यकर्त्याची अशा प्रकारे हत्या वेदनादायी असल्याची भावना मुंडे यांनी व्यक्त केल्या.

****

राष्ट्रीय पोषण पंधरवडा सध्या राबवला जात आहे. माता बालमृत्यूदर कमी करण्यासह कुपोषण निर्मुलनासाठी हा पंधरवडा पाळला जातो. लातूर जिल्ह्यातल्या साई गावचे उपसरपंच अमोल पवार यांनी याबाबत अधिक माहिती दिली.

**बाईट – अमोल पवार**

या गावच्या अंगणवाडी सेविका अनिता शिंदे यांनी या पंधरवड्यात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

**बाईट – अनिता शिंदे**

****

लातूर तालुक्यातल्या कातपूर इथं विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा आज समारोप झाला. या कार्यक्रमात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ५८ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आलं.

****

परभणी जिल्ह्यातल्या ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या वतीने शिक्षकांची गुणवत्तापूर्ण शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत गुणवत्ता मिळवणाऱ्या स्पर्धक शिक्षकांना तालुका आणि जिल्हा स्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक निवडण्यात आला. विजेत्या शिक्षकांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं. विद्यार्थ्यांमध्ये नवनवीन तंत्रज्ञानासोबतच संस्कारांची रुजवणूक होणं गरजेचं असल्याचं मत अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे यांनी व्यक्त केलं. तंत्रज्ञान यूजर फ्रेंडली आणि नॉलेज फ्रेंडली असल्यास ते खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरतं , असं काळे यांनी यावेळी नमूद केलं.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातील महावितरणच्या विविध कार्यालयांमध्ये कोयता हातात घेऊन दहशत माजवणारा आणि कर्मचाऱ्यांना जिवे मारण्याची धमकी देणारा आरोपी शेख कैसर शेख युनुस याच्यावर जिन्सी आणि क्रांती चौक पोलिस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शेख कैसर याने परवा १५ एप्रिल रोजी महावितरणच्या क्रांती चौक आणि अहिंसानगर शाखा कार्यालयात अधिकाऱ्यांना धमक्या दिल्या होत्या.

****

बीड जिल्ह्यातल्या केज शहरात चिकन विक्रीच्या किरकोळ वादातून एका अल्पवयीन मुलाची दुसऱ्या विधिसंघर्ष बालकाकडून निर्घृण हत्या झाल्याची घटना घडली आहे. रेहान कुरेशी असं मृत अल्पवयीन मुलाचं नाव असून या घटनेमुळे केज शहरात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिस संबंधित विधीसंघर्षग्रस्त बालकाचा शोध घेत आहेत.

****

आगामी काही दिवसांमध्ये संभाव्य उष्णतेच्या लाटेची शक्यता पाहता, उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा. उष्माघात उपचारासाठी शासकीय रुग्णालयात सज्जता ठेवण्यात यावी, अशा सूचना बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिल्या आहेत. उन्हामध्ये शारिरीक श्रम करणारे, कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये काम करणारे व्यक्ती, तसंच ५ वर्षांपेक्षा लहान आणि ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी, असं आवाहन पाठक यांनी केलं आहे

****

हवामान

राज्यात आज सर्वाधिक ४३ पूर्णांक चार अंश सेल्सिअस तापमान अकोला इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव इथं ४० पूर्णांक दोन अंश, छत्रपती संभाजीनगर इथं ४१ पूर्णांक चार अंश, परभणी इथं ४१ पूर्णांक पाच अंश तर बीड इथं ४२ पूर्णांक चार अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****